**दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात**
**नियमित दिवाणी दावा क्र. २३६/२०१५**
**निशाणी ७२ लगत आदेश**
**(सोपान विरुध्द नाना )**

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. २ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, दाव्याचे काम चालू असताना प्रतिवादी क्र. २ सजाबाई नाना माने या दि. १२.०४.२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. वादी हे आजारी असल्याने त्यासंना वेळेत वारस अभिलेखावर आणता आले नाहीत. प्रतिवादी क्र. २ यांना वादी व प्रतिवादी क्र. ५ यांचेसह अन्य एक मुलगी वारस आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ चे नावापुढे 'मयत' असे लिहून त्यापुढे 'मयत वारस' वादी व प्रतिवादी क्र. ५ असे लिहून त्याखाली रुक्मीणी राजाराम सुळकुडे यांना समाविष्ट करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**०३.** सदर अर्जावरती प्रतिवादीतर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादीचे कथन की, अर्जातील मजकुर खरा नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** अभिलेख पाहिले असता असे दिसून येते की, वादीने सदरचा दावा हा वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. वादीने नि. ७३ वरती त्याचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे साहजीकच प्रतिवादी हे मयत झाल्यानंतर वारसा हक्काने त्यांचे वाद

मिळकतीमधील हक्क त्यांच्या वारसाकडे स्थलांतरीत होतात. प्रस्तुत दावा हा वाटप होवून मिळणेसाठी असल्यामुळे निश्चितपणे मयत प्रतिवादीच्या वारसांना त्यांची बाजू मांडण्याची व बचावाची संधी देणे गरजेचे वाटते. त्याचवेळी जर दाव्यामध्ये मयत प्रतिवादीचे वारस पक्षकार नसल्यास त्याची दाव्यास बाधा पोहचू शकते. सबब, वादीने केलेल्या विलंबाचा विचार करता खर्चाचा आदेश करुन सदरचा अर्ज मंजूर केल्यास इतर वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –

**आदेश**

१. वादीचा अर्ज रु. २००/– खर्चासह मंजूर करण्यात येतो.

२. वादीने खर्चाची रक्कम प्रतिवादी यांना अदा केलेवर वादीस मयत प्रतिवादी क्र. ०२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी देण्यात येते.

सांगोला (श्री. संजय मो. घुगे)
दिनांक – १२/०३/२०२४. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.